Linear Technologies

*206, Jagruti Industrial Estate, Mogul Lane, Mahim (W), Mumbai 400016. INDIA.*
*Tel : +91-22-24300096 / 7. Fax : +91-22-24300098. Email : sales@lineartechindia.com*

| | |
|---|---|
| **PUBLICATION** | Sakal [Today] |
| **EDITION** | Mumbai |
| **DATE** | Friday, 12 June 2009 |
| **PAGE NO.** | 3 |





'फायर एस्केप शूट' या नव्या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक महालक्ष्मी येथील गोदरेज टॉवर येथे दाखविण्यात आले. (छायाचित्र : प्रशांत चव्हाण)

# आगीपासून बचावासाठी नवे तंत्रज्ञान

मुंबई : मुंबईसारख्या ठिकाणी उंच इमारतींना आग लागल्यावर बचावासाठी अग्निशमन दलाची वाट पाहत बसण्याची आता गरज नाही. कारण- आता 'फायर एस्केप शूट' हे नवे तंत्रज्ञान भारतात आले आहे. इमारतीच्या कोणत्याही भागास आग लागली, की एका कापडी नळकांड्यातून उतरण्याची सोय यामध्ये आहे. इमारतीत हे तंत्रज्ञान बसविणारी गोदरेज प्रॉपर्टी ही पहिली भारतीय कंपनी ठरली आहे. महालक्ष्मी येथील गोदरेज टॉवरमध्ये या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

'मोबाईलटेक्स इव्हॅक्युएशन सिस्टीम' या स्वीडीश कंपनीने हे तंत्रज्ञान विकसित केले आहे. सुमारे ५० मजली इमारतीच्या कोणत्याही भागास आग लागली असता, एका कापडी नळकांड्यातून उतरण्याची सोय यामध्ये असेल. हे कापडी दिसणारे नळकांडे फायबरपासून तयार केलेले असून, ते तीन थरांचे असेल. त्यावर आगीचा कोणताही परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. या उपकरणामुळे एका मिनिटात सुमारे ३० नागरिक खाली उतरू शकतात, असा दावाही स्वीडीश कंपनीने केला आहे. या उपकरणाच्या उद्घाटनाच्या वेळी महापालिकेचे अग्निशमन दलप्रमुख प्रताप करगुप्पीकरदेखील उपस्थित होते.